# राष्ट्रीय विज्ञान शिक्षण संस्था कार्यान्वित

## पुणे आणि कोलकत्यातील संस्थांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे, ता. १८ :** पुण्यातील शास्त्रज्ञांचे गेल्या आठ वर्षांचे स्वप्न येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्षात येत आहे. विज्ञान शिक्षण आणि संशोधनासाठी पुण्यात आणि कोलकत्यात स्थापण्यात आलेल्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च'(आयआयएसईआर) या संस्थेची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे.

या संस्थेत पाच वर्षांचा एमएस्सी अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना 'आयआयटी जेईई' या परीक्षेतील कामगिरीद्वारे या संस्थेत प्रवेश दिला जाणार आहे. गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या शाखांचे पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण तेथे दिले जाईल; तसेच संशोधन पद्धती, संशोधनाच्या दिशा यांबाबत तज्ज्ञ शास्त्रज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. ही संस्थात पुण्यात तूर्तास राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या (एनसीएल) आवारात आहे. पुणे विद्यापीठाच्या मदतीने यंदा अध्यापन केले जाईल; तसेच विद्यापीठाच्या प्रयोगशाळेचा वापर केला जाईल, असे 'एनसीएल'चे संचालक डॉ. एस. शिवराम यांनी 'सकाळ'ला सांगितले.

यंदाच्या 'आयआयटी जेईई' परीक्षेला बसलेले विद्यार्थी प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. भरलेले अर्ज 'प्रकल्प संचालक (प्रोजेक्ट डायरेक्टर), आयआयएसईआर' यांच्या नावे 'संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर ७२१ ३०२' या पत्त्यावर ३० एप्रिलपूर्वी पाठवायचे आहेत.